# Photo Gallery of Departmental activities.

## Following students are doing Psychology Practical








# *Department of Psychology (Group Discussions)*











**Above Psychology students Presenting Seminar in Psychology Departmetnt.**



**Above Psychology student's attend Psychology Seminar in Psychology Department**

## Department of Psychology Organized One Day National Seminar Collaboration with ICSSR Delhi Dated- 01 Feb. 2020

## Topic of *"The Importance of sports, Physical Education and Psychology the present scenario"*




**Inauguration function of this National Level Conference at Shivaji College Hingoli**




**Above Pioneer of this institution Respected Hon. Shivajirao Pawar (Ex Educational Officer) had delivered presidential Speech.**




**Keynote Speakar Respected Dr.H.J.Narke  delivered his Speech during the National Conference**




**Dr. Sirsath Had given feedback on the *Psychology National Level Conference* at Shivaji College Hingoli.**

# शिवाजी महाविद्यालयात जागतिक मानसिक आरोग्य दिन साजरा

देशोन्नती वृत्तसंकलन...

**हिंगोली** ■ येथील शिवाजी महाविद्यालयात मानसशास्त्र विभाग व राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा शासकीय रुग्णालय हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने 'जागतिक मानसिक आरोग्य दिन' साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी. जी. गायकवाड होते. त्याचबरोबर या कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्याते म्हणून हिंगोली जिल्ह्यातील सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ञ डॉ. दिपक डोनेकर (विभाग प्रमुख, मानसोपचार विभाग जिल्हा रुग्णालय) यांच्यासह शांतिरत्न थोरात, सायकॅट्रिक नर्स, रामेश्वर अंभोरे, समुपदेशक हे उपस्थित होते. जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त डॉ.दिपक डोनेकर यांनी 'ताण व्यवस्थापन' या विषयावर सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली.

ताण व्यवस्थापनावर बोलतांना ते म्हणाले की ताण म्हणजे काय त्याची कारणे व त्याची लक्षणे ओळखता येतात, प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात ताण हा असतोच, फक्त त्याचे प्रमाण कमी अधिक असते, निर्माण झालेला ताण हा कमी करता येतो याचे विविध तंत्र त्यांनी सांगितले.सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बी. एस. जाधव यांनी केले तर प्रास्ताविक व आभार प्रदर्शन विभाग प्रमुख डॉ. सुभाष शेरकर यांनी केले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील डॉ. के. एन. इंगोले, डॉ. श्रीराम कऱ्हाळे, डॉ. संदिप लोंढे, प्रा. चौतमल, प्रा. शिंदे, प्रा. घुगे, प्रा. बांगर, प्रा. घोडेकर, प्रा. प्रियांका पवार, प्रा. नैमुन्नीसा श्री सुभाष जरे सह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. (प्रतिनिधी)




# Celebration of World Sucide Prevention Day

## on dated 10 Sept 2022.


**In that day we show Poster Exibution Progeam Inaugurator of this Poster Exibution,Hon. Shivajirao Pawar, (Former Educaion officer, Hingoli ) Principal this college, Dr. Gaikwad B.G. and Vice -Principal Dr.Kshirsager B.S.**







**Psychology student showing the poster to the guest**




*Broacher of this Poster Exhibition*



पुढारी

# शिवाजी महाविद्यालयात पोस्टर प्रदर्शन

हिंगोली, पुढारी वृत्तसेवा : येथील मानसशास्त्र विभाग शिवाजी कॉलेज हिंगोलीच्या वतीने जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन साजरा करण्यात आला. दरवर्षी हा दिवस १० सप्टेंबर या दिवशी संपूर्ण जगभरात साजरा केला जातो. याचे औचित्य साधून महाविद्यालयात पोस्टर प्रदर्शन भरविण्यात आले होते. त्याचे उद्घाटन डॉ. अजय टेंगशे व शिवाजीराव पवार, मंदा पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

दिवसेंदिवस आत्महत्येचे प्रमाण हे वाढत आहे. आत्महत्या साठी बरेच कारणे जबाबदार आहेत. त्यात कौटुंबिक समस्या, अपयश, व्यसन, बदनामी, अवास्तव अपेक्षा, प्रेमभंग, बेरोजगारी, संपत्तीचा वाद, आर्थिक परिस्थिती, अत्याचार आदी कारणांचा समावेश आहे. आत्महत्या थांबल्या पाहिजेत याकरिता पोस्टर प्रदर्शन भरविण्यात आले होते. यातून हाच संदेश देण्याचा एक प्रयत्न आहे की, आपल्याला मिळालेले जीवन हे खूप सुंदर आहे, नेहमी सकारात्मक विचार करून जगले पाहिजे व आपले वर्तन प्रेरणादायी करावे.या पोस्टर प्रदर्शनासाठी डॉ. सुभाष शेरकर व डॉ. बी. एस.जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. जी. गायकवाड, उपप्राचार्य डॉ. बी. एस. क्षीरसागर यांच्यासह महाविद्यालयातील संपूर्ण प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

My Parbhani/Hingoli Edition
Sep 12, 2022 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

## Celebration of World Mental Health Day.

### On dated 10 October 2022.

**President of this program Hon. Shivajirao Pawar, (Former Educaion officer, Hingoli ) Chif Guest of this program Dr.Dipak Donekar (Psychiatrist) Principal college, Dr. Gaikwad B.G. and Vice – Principal Dr.Kshirsager B.S.**




**Principal of this College, Dr. B. G. Gaikwad Facilitation of this Program Guest**.




**पुढारी**



# मानसिक आरोग्य दिन साजरा

**हिंगोली :** येथील शिवाजी महाविद्यालयात मानसशास्त्र विभाग व राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा शासकीय रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक मानसिक आरोग्य दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ.बी.जी. गायकवाड होते. त्याचबरोबर या कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्याते म्हणून मानसोपचार तज्ज्ञ डॉ. दीपक डोनेकर यांच्यासह शांतीरत्न थोरात, रामेश्वर अंभोरे हे उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. बी. एस. जाधव यांनी केले तर प्रास्ताविक व आभार प्रदर्शन विभाग प्रमुख डॉ. सुभाष शेरकर यांनी केले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील डॉ. के. एन.इंगोले, डॉ. श्रीराम कऱ्हाळे, डॉ. संदीप लोंढे, प्रा. चौतमल, प्रा. शिंदे, प्रा. घुगे, प्रा. बांगर, प्रा. घोडेकर, प्रा. प्रियांका पवार, प्रा. नैमुन्नीसा सुभाष जरे सह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

My Parbhani/Hingoli Edition
Oct 11, 2022 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

**Topper students given *Free Practical Record Book* by Psychology Department and motivate them.**







**Group Photo of Topper students in the BASY Class. Academic Year 2022-2023**